अग्रलेखांचा नवाकाळ बादशहा

संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवाकाळ

।। न मे भक्त: प्रणश्यति ।।

अग्रलेखांचा नवाकाळ बादशहा

# टोलवसुलीची टगेगिरी आणि टोलफोड

राज्यभरात टोलनाक्याविरुध्द तोडफोडीचा उद्रेक उसळला. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या कार्यकर्त्यांनी राज्यातल्या जवळपास दहा टोलनाक्यांवर निदर्शने करून टोलवसुलीची पठाणी पध्दत बंद पाडली. राज ठाकरे यांनी यापूर्वीच राज्यातील टोलवसुलीविषयी निश्‍चित धोरण आखावे, टोल वसुलीच्या नावाने चालणारा भ्रष्टाचार थांबवावा आणि सामान्य माणसाला भरावा लागणारा हा जिझिया कर रद्द करावा, अशी मागणी केली होती. परंतु त्याकडे राज्य सरकारने पाहिजे तितके लक्ष दिले नाही. कोल्हापूरला लोकांनी उत्स्फुर्तपणे आंदोलन केले. त्यांची तीव्रता एवढी होती की, सरकारला दखल घेणे भाग पडले. मात्र याबाबत तातडीने उपाययोजना करायला सरकार तयार नाही हे ज्यावेळेला सिध्द झाले, तेव्हा या उद्रेकाशिवाय दुसरे काहीच घडू शकणार नव्हते. कारण मुख्यमंत्री ज्यावेळेला टोलचे समर्थन करायला लागले, टोल नसेल तर राज्यातल्या रस्त्यांचा विकास होणार नाही, अशी पडखाऊ भाषा वापरायला लागले. त्यावेळेला सत्ताधाऱ्यांना टोलची तिजोरी हवी आहे हे स्पष्ट झाले. आज सामान्य माणसाचा विचार करण्याऐवजी टोलनाके चालवणाऱ्या मूठभर कंत्राटदारांच्या तिजोऱ्यांचे संरक्षण महत्त्वाचे वाटले. कारण याच तिजोऱ्यांमधून अनेक राजकारण्यांना आणि सत्ताधाऱ्यांना घरपोच रसद पोहोचते. ती बंद करणे त्यांना परवडणारे नाही. म्हणूनच टोल टिकवणारे टिकमचंद त्यांची वकिली करत राहिले. जागोजागी उगविलेले हे टोलनाके म्हणजे लोकांच्या खिशावर टाकलेला जबदरस्तीचा भुर्दंड ठरतो, यात काही शंका नाही. त्याविरुध्द आज ना उद्या असंतोष व्यक्त होणारच होता. मुळातच मनसेने हा विषय हाती घेतल्यामुळे त्यांनीच तो निकाली काढण्याचा निर्धार केलेला दिसतो.

### नियोजन नाही केवळ राजकारण

महाराष्ट्रासारख्या प्रगतिशील राज्यामध्ये विकासाचे धोरण राबविताना अशाप्रकारचा भोंगळपणा चालू रहावा हे आश्‍चर्य ठरते. राज्याचा विकास करायचा असेल तर तातडीने पायाभूत सुविधा आवश्यक ठरतात. त्यामध्ये रस्ते, पाणी, वीज यांचा प्राधान्याने विचार करावा लागतो. इथे तर लोकांनाच वेठीला धरले गेले. तुम्हाला रस्ते हवे असतील तर टोल भरा, अशाप्रकारची धमकीच अंमलात आणली गेली. लोकांना चांगले रस्ते हवे आहेत. याचा अर्थ त्यांच्या या गरजेचा गैरफायदा घेण्याचे काम सरकारने आणि थेट आर्थिक हितसंबंध असणाऱ्या कंत्राटदारांनी केले. रस्त्यांसाठी सरकार लोकांकडून वेगवेगळ्या पध्दतीत कर वसूल करते. वाहन चालकांकडून रोड टॅक्स घेतला जातो किंवा वाहन कराच्या माध्यमातून पैसे वसूल केले जातात. वाहन परवाने देतानासुध्दा योग्य ती फी वसूल केली जाते. काही वाहने सेवा देत असतात म्हणून सर्व्हिस टॅक्स घेतला जातो. मालाची ने-आण होते म्हणून ऑक्ट्रॉयच्या ऐवजी एलबीटी घेतला जातो. म्हणजे या ना त्या मार्गाने कर वसूल करून सरकारी तिजोरीत जो कोट्यवधींचा महसूल जमा होतो. त्यातून सरकारला रस्ते बांधणीचे प्रकल्प राबविता येऊ शकतात. खरी परिस्थिती अशी आहे की, लोक टोल द्यायलाही तयार आहेत. परंतु, त्याची आकारणी ठराविक कालावधीसाठी झाली पाहिजे. रस्ता बांधणीसाठी झालेला खर्च वसूल झाल्यानंतरही पुढे पाच पाच वर्षे बिनधास्तपणे टोल वसूल केला गेला म्हणजे लोक काही बोलत नाहीत किंवा त्याचा हिसाब-किताब विचारत नाहीत म्हणून त्यांच्या खिशातून पैसे काढत सुटायचे, अशाप्रकारचा हावरटपणा सरकारने केला. टोलवसुलीमागे कोणतेही अभ्यासपूर्ण आर्थिक नियोजन नाही. असलेच तर फक्त पैसेखाऊ राजकारण आहे हेही आता लपून राहिलेले नाही. ज्यावेळेला एखादी गोष्ट सरळमार्गाने होत नाही, त्यावेळेला त्याविरुध्दचा असंतोष धुमसत राहतो आणि मग राजकीय पक्ष किंवा सामाजिक संघटना त्या असंतोषाला वाट करून देतात. तसा प्रकार या टोल नाक्यावरील तोडफोडीबाबत झालेला आहे.

### टोलचे पैसे जातात कुठे?

ज्यावेळेला एखादा राजकीय पक्ष आंदोलनात उतरतो त्यावेळेला राजकीय हेतू आहे हे वेगळे सांगण्याची गरज उरत नाही. मात्र एका सामाजिक उद्देशाला मिळालेले एक राजकीय वळण असते हे नाकारूनही चालणार नाही. अनेक टोलनाक्यावर सनदशीरपणे टोल घेतानाच जेव्हा टगेगिरी व्हायला लागली. त्यावेळेला त्याचा समाचार घेतलेला दिसतो. आता कायदा हातात घेऊन आंदोलन करणे योग्य की अयोग्य हा नेहमीच वादाचा मुद्दा राहतो. परंतु टोल वसूल करताना जेव्हा कायदाच धाब्यावर बसविला गेला. त्यावेळेला त्याचे उत्तरही द्यावे लागेल. लोकांकडून पैसे वसूल करताना कायद्याचे हात बांधले जातात आणि जनतेलाही बुक्क्यांचा मार सहन करावा लागतो. तो प्रकार या टोलवसुलीतल्या टगेगिरीत झालेला आहे. अगदी आज जरी दोन टोलनाक्यांच्यामध्ये असणाऱ्या पाच-दहा किलोमीटरच्या रस्त्यांची अवस्था तपासली तर लोकांनी टोल का द्यावा? असा सरळ प्रश्‍न उपस्थित होईल. रस्त्यांवर असलेल्या खड्ड्यांपासून ते अपघाताच्या वेळी द्रुतगती मार्गावर साधी ॲम्ब्युलन्सही उपलब्ध न होण्यापर्यंत बेपर्वाई पहायला मिळते. मग वसूल केलेले टोलचे पैसे जातात कुठे? असा प्रश्‍न निर्माण होतो. नुसती टोलवसुली करून अनेक कंत्राटदार गडगंज संपत्तीचे मालक झाले. राजकारण्यांची छुपी भागीदारी घेऊन त्यांनी प्रायव्हेट लिमिटेड कंपन्या स्थापन केल्या. पैशाची खिरापत वाटून आपली ही टोलवसुलीची पेढी आजन्म चालू रहावी अशी तरतूदही केली. म्हणून या टोलला कुणीही विरोध करीत नव्हते. आता मात्र सरकारला याबाबत निश्‍चितच भूमिका स्वीकारावी लागेल. रस्तोरस्ती आणि वर्षांनुवर्षे चालणारी टोलवसुली बंद करावी लागेल. एवढे झाले तरी या टोलफोडचा उपयोग झाला असे म्हणता येईल. पायाभूत सुविधा आणि विकास याचा समतोल साधायचा असेल तर विकासाच्या नावाखाली पावलोपावली जर करवसुली होऊ लागली तर लोकांना जगणे मुश्किल होईल. म्हणूनच या सगळ्या विकास प्रक्रियेमध्ये आर्थिक नियोजनाला विशेष महत्त्व आहे. त्याच्याऐवजी राजकारणच केले जाते. आणि मग असे राजकारणातले लुळे-पांगळे अर्थकारण टोलवसुली करून म्हणजेच दात कोरून पोट भरत राहते.